| MHKO030011022020 | **म.कौ.हि.सं.का.अर्ज नं. २३/२०२०**<br>**<u>निशाणी क्र. ५ वर आदेश</u>**<br>सुप्रिया संभाजी नेवगे **वि.**<br>संभाजी अण्णासो नेवगे. |
|---|---|

यातील अर्जदार यांनी प्रस्तुत अर्ज कौंटुबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा, २००५ (संक्षिप्तेकरिता या पुढे “संरक्षण कायदा” असे संबोधले आहे.) च्या कलम २३ नुसार अंतरीम आदेशाकरिता दाखल केलेला आहे.

०२. अर्जदार १ ने पहिल्या लग्नापासून घटस्फोट झालेनंतर वि. प. १ याचेशी दिनांक २१/०७/२०१८ रोजी दुसरे लग्न केलेले आहे. अर्जदार क्र. १ हिस पहिल्या लग्नापासून एक मुलगा आहे. सदरची बाब माहिती असतानाही वि. प. १ ने त्याचा स्वीकार करून अर्जदार १ शी लग्न केलेले आहे. लग्न करतेवेळी वि. प. १ ने वि. प. २ शी घटस्फोट झालेची खोटी माहिती अर्जदार १ ला दिलेली होती. लग्न झालेनंतर वि. प. १ हा अर्जदार १ हीस त्याचे नोकरीचे ठिकाणी चंदगड येथे घेऊन गेला. त्यानंतर दि. २९/०४/२०१९ रोजी अर्जदार ३ सई हीचा जन्म झाला. त्यानंतर अर्जदार १ या वि. प. १ ची बदली मालवण येथे झालेने तेथे राहू लागली. त्यानंतर तेथे वि. प. १ ने मारहाण केलेने सदरची बाब अर्जदार १ ने माहेरी कळवली व त्यानंतर पोळगाव येथे आली असता तेथे वि. प. २ ही वि. प. १ ची पहिली पत्नी तेथे रहात असल्याचे व त्यांचा घटस्फोट झाला नसल्याचे समजून आले. अर्जदार १ तेथे रहात असताना सर्व वि. प. नी अर्जदारास शारीरीक, मानसिक प्रकारे अत्यंत छळ केलेला आहे. त्यानंतर वि. प. १ व २ यांना मुल होत नसलेने अर्जदार १ हीचेशी लग्न केलेचे सत्य समजले. अर्जदार २ शौर्य हा अर्जदार १ हीचा पहिल्या लग्नापासून झालेला मुलगा

असल्याने त्याला शिवीगाळ करून वाईट वागणूक सर्व वि. प. देत असत. अर्जदारांना जीवे मारणेचा प्रयत्न वि. प. कडून होत असलेने अर्जदार १ या सध्या कोल्हापूर येथे भाडयाने खोली घेऊन रहाणेस आहेत. अर्जदार १ कडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. सबब अर्जदाराने वि. प. १ यास नोटीस पाठवून पोटगीची मागणी केली. परंतु वि. प. यांनी कोणताही प्रतिसाद न दिलेने अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

०३. वि. प. १ ते ५ यांनी नि. १३ वर म्हणणे देउन अर्जदारांची कथन नाकारलेली आहेत. वि. प. नी असे कथन केले आहे की, अर्जदार १ ने लग्नाची तारीख चुकीची कथन केली असून दि. २१/०६/२०१८ रोजी अर्जदार १ शी वि. प. १ चा विवाह झालेला आहे. अर्जदार १ ने वि. प. १ शी लग्न करतेवेळी तिचा पहिल्या पतीपासून घटस्फोट झाल्याचे खोटे कथन केलेले होते. अर्जदार १ हीचा तिचे पहिले पतीशी दि. १६/०७/२०१८ रोजी घटस्फोट झालेला आहे. तसेच अर्जदार २ याला त्याच्या वडीलांकडून दरमहा रू. ५०००/– इतका खर्च मिळतो. अर्जदार १ हीस वि. प. १ च्या पहिल्या पत्नीस हदयविकाराचा त्रास आहे व तिला मुल होऊ शकत नाही परंतु तिची जबाबदारी वि. प. १ वर आहे, याबाबतची सर्व माहिती लग्नामध्ये दिलेली होती व ती तिला मान्य देखील होती. वि. प. ४ व ५ हे विभक्त रहात आहेत. लग्नामध्ये ठरल्याप्रमाणे अर्जदार २ याची संपूर्ण जबाबदारी वि. प. १ ने घेऊन त्याच्या शिक्षणाची व इतर सोय केलेली होती. परंतु अर्जदार १ हीने किरकोळ कारणांवरून लग्न झालेपासून वि. प. यांना प्रचंड मानसिक त्रास दिलेला आहे.

त्याबाबत वेळोवेळी वि. प. ने पोलिस स्टेशन, पोलिस निरीक्षक कार्यालय, मानवाधिकार फोरम, तंटामुक्ती अध्यक्ष यांचेकडे अर्ज केलेला आहे. तसेच वि. प. १ हे कामानिमित्त आजरा येथे आले असताना अर्जदार १ व ३ हे सर्व अर्जदार २ याच्या शिक्षणामुळे मालवण येथे रहात होते व त्यावेळी अर्जदार १ ही वि. प. यास कोणतीही कल्पना न देता घरातील सर्व सोने–चांदीचे दागिने व किंमती चीजवस्तू घेऊन माहेरी निघून गेलेली आहे. वि. प. १ सध्या देखील अर्जदार १ ते ३ यांची सर्व जबाबदारी घेण्यास तयार आहेत. परंतु अर्जदार १ ही कोणताही प्रतिसाद देत नाही. अर्जदार ही उच्चशिक्षीत असून खाजगी नोकरी करते. सबब अर्जदाराचा प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करणेची विनंती वि. प. यांनी केलेली आहे.

०४. अर्जदारांचे व वि. प. चे विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकणेत आला.

०५. अर्ज, अर्जदारचे शपथपत्र, वि. प. चे म्हणणे तसेच अर्जदारांनी दाखल केलेली कागदपत्रे तसेच अभिलेखाचे अवलोकन केले असता खालील मुद्दे माझ्याकडे उपस्थित झाले. त्या प्रत्येक मुद्दयांवर कारणांसहीत निष्कर्ष खालीलप्रमाणे सादर केले आहेत.

| **अ.नं.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदारवर वि. प. यांनी घरगुती हिंसाचार केल्याचे प्रथम दर्शनी सिध्द होते काय ? | होकारार्थी |
| २. | अर्जदार अंतरिम पोटगी मिळणेस पात्र आहेत का ? | अंशतः मंजूर |
| ३. | काय आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

**– कारणमिमांसा –**

**मुद्दा क्रमांक १ ते ३ बाबत :–**

०६. वरील मुद्दे एकमेकांशी संलग्न असल्यामुळे त्यावर दिलेल्या कारणांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी ते एकत्र चर्चिले आहेत. सदर कामामध्ये अर्जदारने वि.प. यांचे बरोबर विवाह झाले असले बाबत नमूद केले आहे. त्याकरिता अर्जदार यांनी कागदपत्रांच्या यादीमध्ये नि.३ कडे अर्जदार १ ने वि. प. विरूध्द पोलिस स्टेशन, महिला सहाय्य कक्ष इ. ठिकाणी केलेल्या तक्रारीची प्रत, आजरा येथील रहिवासी दाखला व आधारकार्ड असे कागदपत्र दाखल केलेले आहेत. वि. प. १ यांनी नि. १४ खाली अर्जदार १ हिचा तिच्या पहिल्या पासून घटस्फोट झालेचे निकालपत्र, वि. प. १ ने अर्जदार १ विरूध्द विविध ठिकाणी केलेले तक्रारी अर्ज दाखल केलेला आहे.

०७. अर्जदारांचे विधिज्ञांनी त्यांच्या अर्जाप्रमाणेच युक्तिवाद केला. तसेच त्यांनी असा युक्तिवाद केला की, वि. प. १ ने त्याच्या पहिल्या पत्नीची बाब न सांगता फसवणूक करून अर्जदार १ शी लग्न केलेले आहे. वि. प. १च्या पहिल्या पत्नीस मुल होत नव्हते केवळ या कारणाकरीता वि. प. १ ने अर्जदारासोबत दुसरे लग्न केलेले आहे. अर्जदारास मुलगी झालेनंतर वि. प. कडून हिन वागणूक देण्यात आलेली आहे. वि. प. हे केवळ अर्जदार ३ सई हिचा योग्य प्रकारे सांभाळ करत असत व अर्जदार २ हा अर्जदार १ चा पहिल्या लग्नाचा मुलगा असलेने त्याला शिविगाळ व मारहाण करत

असत. अर्जदार १ हिस वि. प. १ च्या पहिल्या पत्नीसोबत घटस्फोट झालेला नाही व ती आजरा येथे रहाते हे समजलेपासून अत्यंत शारीरीक, मानसिक छळ केलेला आहे. अर्जदार १ हीला जीवे मारणेकरीता अनेक प्रयत्न वि. प. नी केलेले आहेत. अर्जदार १ ही आज ना उद्या वि. प. चे स्वभावात बदल होईल या आशेने संसार करीत होती. परंतु अर्जदार २ व ३ यांच्या जीवीताचे विचार करून ती माहेरी रहाणेस आली. परंतु अर्जदार २ च्या शैक्षणिक कारणामुळे व अर्जदार ३ च्या इतर सोयीचे कारणामुळे सध्या ती कोल्हापूर येथे भाडयाने रहात आहे. अर्जदार हिस उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. सबब अर्जदाराने प्रस्तुत अर्जातून पोटगीची मागणी केलेली आहे. अर्जदाराने त्यांचे कथनापृष्ठर्थ मा. मुंबई उच्च न्यायालयाचा न्यायनिर्णय दाखल केलेला आहे.

***श्री. दत्तात्रय ज्योती अडसूळे वि. सौ. सुमित्रा उर्फ सुमा दत्तात्रय अडसुळे आणि इतर फौजदारी रीट पिटीशन नं. २५२८/२००४.***

०८. वि. प. च्या विधिज्ञांनी त्यांच्या अर्जाप्रमाणेच युक्तिवाद केला. तसेच असा युक्तिवाद केला की, अर्जदार १ हीचे पहिल्या लग्नाबाबतचे प्रकरण न्यायप्रविष्ठ असताना फसवणूक करून अर्जदार १ हीने वि. प. १ शी घटस्फोट झालेचे भासवून लग्न केलेले आहे. अर्जदार १ हीचेसोबत लग्न करतेवेळी वि. प. २ म्हणजेच वि. प. १ ची पहिली पत्नी असलेबाबत व तिच्या वैद्यकीय कारणांची सर्व कल्पना अर्जदार व तिच्या माहेरील लोकांना देण्यात आलेली होती. सर्व वस्तुस्थिती मान्य करून अर्जदार

१ ही लग्नासाठी तयार झालेली होती. अर्जदार १ हीने वस्तुस्थितीचा विपर्यास करून सदरचा खोटा अर्ज दाखल केलेला आहे. वि. प. १ हा अर्जदार १ व ३ यांची संपूर्ण पालनपोषणाची जबाबदारी घेणेस तयार आहे. लग्न करतेवेळी देखील अर्जदार २ हा अर्जदार १ हिचा पहिल्या लग्नापासूनचा जरी मुलगा असला तरी त्यांची संपूर्ण जबाबदारी घेण्यास तयार असल्याचे मान्य केलेले होते व त्याप्रमाणे अर्जदार २ याचा संपूर्ण शैक्षणिक खर्च वि. प. १ने वेळोवेळी केलेला आहे. तसेच अर्जदाराचे बाळंतपणाचा देखील संपूर्ण खर्च वि. प. १ ने केलेला आहे. अर्जदार १ ते ३ यांचेसोबत आजदेखील रहाणेची व संसार करणेची वि. प. १ ची इच्छा आहे. परंतु मालवण येथे असताना कोणत्याही संयुक्तिक कारणाशिवाय अर्जदार १ ही मुलांना घेऊन घरातील सर्व किंमती चीजवस्तु घेऊन निघून गेलेली आहे. त्यामुळे अर्जदार १ हिचा प्रस्तुतचा नामंजूर करणेची विनंती वि. प. यांनी केलेली आहे.

९. वि. प. ने त्यांचे कथनापृष्ठर्थ मा. आंध्रप्रदेश उच्च न्यायालयाचा न्यायनिर्णय दाखल केलेला आहे.

***सयान्ना वि. लक्ष्मीबाई व इतर १९९१ डी. जी. एल. एस. (ए. पी.) ४३०*** सदर न्यायनिर्णयाअन्वये व्यक्तीची प्रथम पत्नी जीवंत असताना दुसरे लग्न झाले तर असे लग्न लग्न हे निरर्थक (Void) ठरते व दुसरी पत्नी ही तिचे पतीपासून पोटगीची रक्कम

मिळणेस पात्र नाही. सदर न्यायनिर्णयामध्ये मा. आंध्रप्रदेश उच्च न्यायालय यांनी पुढील निरीक्षण नोंदवलेले आहे.

**Section 5(1) of the Hindu Marriage Act** Lays down or a lawful marriage, the necessary condition is that neither party should have a spouse living at the time of the marriage. A marriage in contravention of this condition is, therefore, null and void. While the legislature has considered it advisable to uphold the legitimacy of the paternity of a child born out of a void marriage. It has not extended a similar protection in respect of the mother of the child.

१०. सदर कामी अर्जदाराचे विधिज्ञांनी युक्तिवाद केला व असे कथन केले की, अर्जदारास वि. प. १ चा घटस्फोट झालेचे खोटे कथन करून सदरचे लग्न केलेले आहे. तसेच अर्जदार ही वि. प. १ ची पत्नी असल्याचे वि. प. १ ने मान्य केलेले आहे. त्यामुळे वि. प. १ ने अर्जदार १ हिची सध्याची परिस्थिती पहाता पोटगी देणे गरजेचे आहे.

११. प्रस्तुत कामातील संरक्षण अधिकारी यांचा अहवाल उपलब्ध नाही. परंतु अर्जदाराने पोलिस स्टेशन, महिला सहाय्य कक्ष इ. ठिकाणी केलेल्या तक्रारींवरून अर्जदारावर झालेला हिंसाचाराची कथने शाबित होतात. त्यामुळे अर्जदारावर झालेला कौटुंबिक हिंसाचार नाकारता येणार नाही. तसेच लग्नाचे वेळी वि. प. १ याने अर्जदार

हिचा पहिल्या लग्नापासूनचा मुलगा कु. शौर्य यांची जबाबदारी घेण्याचे मान्य केलेले आहे. त्यामुळे अर्जदार क्र. १ ते ३ यांची जबाबदारी वि. प. १ हा नाकारू शकत नाही.

१२. अशा परिस्थितीत वि.प.१ यांनी अर्जदार यांच्या उदरनिर्वाहाची सोय पाहणे गरजेचे आहे. अर्जदारने तिच्या प्रस्तुत अर्जामार्फत वि.प. यांच्याकडून अर्जदार यांना रक्कम रुपये ३५,०००/– इतकी पोटगी, मिळावी अशी मागणी केली आहे.

१३. अर्जदारांनी वि. प. च्या उत्पन्नाबाबत कथन केले आहे की, वि. प. १ हा अर्बन बँक शाखा कारवा येथे नोकरीस असून त्यास दरमहा रक्कम रू. ४०,०००/– इतका पगार मिळतो. तसेच वि. प. १ हे दरसाल काजूची विक्री करतात व त्यातून त्यांना वार्षिक ५ ते ६ लाख इतके उत्पन्न मिळते. वि. प. यांची पोळगाव येथे शेती असून त्यातून त्यांना दरसाल ५ लाख रूपये इतके उत्पन्न मिळते. वि. प. १ यांचेवर अर्जदारांचे व्यतिरीकत इतर कोणाचीही जबाबदारी नाही. वि. प. यांनी असे कथन केले आहे की, अर्जदार क्र. १ हीस पहिल्या पतीपासून दरमहा रू. ५०००/– इतकी पोटगी मिळते व अर्जदार क्र. २ यास दरमहा रू. ५०००/– इतकी पालनपोषणाची रक्कम मिळते. अर्जदार हीस पुन्हा सासरी नेऊन नांदवणेसाठी वि. प. आज देखील तयार आहेत. तसेच त्यांच्या पालनपोषणाची संपूर्ण जबाबदारी घेण्यास देखील तयार आहेत. अर्जदार या स्वतःहून वि. प. चा त्याग करून निघून गेलेल्या आहेत.

१४. अभिलेखावरील उपलब्ध कागदोपत्री पुरावा पाहिला असता अर्जदाराने त्यांचे कथनाव्यतिरिक्त वि. प. यांच्या उत्पन्नाबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा त्यांचे कथनापृष्टर्थ सादर केलेला नाही.

१५. सबब, अंतरिम आर्थिक मदतीची रक्कम ठरविण्यासाठी दोन्ही पक्षकारांचे राहणीमान, वि.प. १ चे उत्पन्न याचा विचार होणे गरजेचे आहे. अर्जदार यांनी वि. प. यांच्या उत्पन्नाबाबत कथने केलेली आहेत. वि. प. १ यांचेवर अर्जदार यांच्याशिवाय इतर कोणचीही जबाबदारी नाही. अशा परिस्थितीत अर्जदार क्र.१ यांचे पती अर्जदार क्र. २ व ३ यांचे पिता म्हणून त्यांची नैतिक व कायदेशीर दृष्टया जबाबदारी वि. प. १ यांचेवर आहे. त्यामुळे अर्जदारांना अंतरिम आर्थिक मदत करणे गरजेचे ठरणार आहे. सदर कामाचे अवलोकन केले असता, अर्जदार क्र. १ ते ३ हे अंतरीम पोटगी मिळणेस पात्र ठरतात. सबब मी मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी नोंदवून, मुद्दा क्र.२ अंशतः मंजूर करते व मुद्दा क्र. ३ करीता खालील आदेश पारीत करते.

## आदेश

१. अर्ज नि.५ अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. वि.प. १ यास असे आदेश करण्यात येते की त्यांनी अंतरिम पोटगी म्हणून अर्जदार १ ते ३ यांना एकत्रीत दरमहा रू.४०००/– (फक्त चार हजार) अर्ज दाखल तारखेपासून मूळ अर्जाच्या अंतिम निकालापर्यंत देण्याचा अंतरिम आदेश करण्यात येतो.

३. अर्जदार यांना आदेशीत करण्यात येते की त्यांनी पुढील दोन तारखांमध्ये त्यांचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र सादर करावे अन्यथा योग्य ते आदेश पारित करण्यात येतील.

४. या आदेशाची प्रत उभय पक्षकारांना कलम २४ अन्वये विनामुल्य देणेत यावी.

(आदेश खुल्या न्यायालयात जाहिर)

Digitally signed by APARNA DAYANAND GADE
Date: 2021.11.18 17:43:28 +0530

दि. १८/११/२०२१ (ए. डी. गाडे)

कोल्हापूर ८ वे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,कोल्हापूर.